॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)



## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. ३ नोव्हेंबरः वंदे मातरम् या गीताला १५० वर्ष पूर्ण होत असल्याने वंदे मातरम@१५० या थीमवर आयोजित कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात दि. ५ ते ९ नोव्हेंबर या दरम्यान होणाऱ्या एकविसाव्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ **इंद्रधनुष्य युवक महोत्सव** २०२५ ची तयारी अंतिम टप्प्यात असून पाच रंगमंचांवर विद्यार्थ्यांचा कलाविष्कार अनुभवायला मिळणार आहे. दरम्यान कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांनी या महोत्सवाच्या तयारीचा आढावा घेतला.

यावेळी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, राज्यपाल नियुक्त व्य.प. सदस्य राजेंद्र नन्नवरे, व्य.प. सदस्य नितीन झाल्टे व कुलसचिव डॉ.विनोद पाटील, अधिसभा सदस्य स्वप्नाली काळे, दिपक पाटील हे देखील उपस्थित होते. विद्यापीठ परिसरात या महोत्सवाची जय्यत तयारी विद्यापीठातर्फे करण्यात आली असून विद्यापीठाच्या प्रवेशद्वारापासून ते मुख्य प्रशासकीय इमारतीपर्यंत विविध फलक, सजावट, रस्त्याच्या दुतर्फा सजावट करण्यात आली. त्यामुळे विद्यापीठ परिसरात चैतन्यमय वातावरण निर्माण झाले आहे. राज्यातील २६ विद्यापीठातील १४०० सहभागींची विद्यापीठाच्या वेगवेगळया वसतिगृहांमध्ये निवासाची व्यवस्था आणि भोजनाची व्यवस्था शिक्षक भवन परिसरात करण्यात आली आहे.

सहभागी संघाचे आगमन दि.४ नोव्हेंबर पासून सहभागी होणार असून दि. ५ रोजी सकाळी ९.०० वाजता विद्यार्थी स्पर्धेचे उद्घाटन होण्यापूर्वी सहभागी संघाची शोभायात्रा असणार आहे.विविध कलाप्रकार सादरीकरण करण्यासाठी पाच रंगमंचाची व्यवस्था करण्यात आली आहे. रंगमंच क्र. १ ला बंकीमचंद्र चटोपाध्याय रंगमंच (दीक्षांत सभागृह), रंगमंच क्रमांक २ला स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृह, रंगमंच क्रमांक ३ ला नेताजी सुभाष चंद्र बोस, रंगमंच क्रमांक ४ ला क्रांतिवीर खाजा नाईक सभागृह, रंगमंच क्रमांक ५ ला शिरीष कुमार मेहता सभागृह अशी स्वातंत्र्यसेनानींची नावे देण्यात आली आहेत. अशी माहिती महोत्सवाचे आयोजन सचिव तथा संचालक विद्यार्थी विकास विभाग डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी दिली.

**बातमी नं. २**

जळगाव, दि. ३ नोव्हेंबरः कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात प्राध्यापक प्रबोधिनी अंतर्गत प्रशासनातील कौशल्य व कामाचे नियोजन या विषयावर प्रशाळेतील प्राध्यापकांची समूह चर्चा आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमप्रसंगी प्रशाळेचे संचालक प्रा.म.सु. पगारे हे अध्यक्षस्थानी होते.

या कार्यक्रमप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले केअर ऑफ पब्लिक सेफ्टी असोसिएशन (कॉप्स) महाराष्ट्र राज्य या संस्थेचे अध्यक्ष अमर एकाड यांनी प्रशासकीय व्यवस्थापनात प्रशासन व प्रशासना संदर्भात येणाऱ्या अनेक बाबी याविषयी माहिती देत समूह चर्चेला सुरुवात केली.

आपल्या अध्यक्षीय मनोगतातून प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. म.सु. पगारे म्हणाले की, आपण जेथे काम करत आहोत तेथील अनुभवांच्या व्यतिरिक्त बाहेरील प्रशासनातील आलेले अनुभव देखील आपणास योग्य प्रशासन चालविण्यासाठी उपयुक्त ठरत असतात. प्रशासनात पारदर्शकता आणण्यासाठी योग्य नियोजनाची सांगड घालत ऐतिहासिकता निर्माण करता येते प्रशासनातील आपले काम चोख बजावले पाहिजे. याबरोबरच, प्रशासकीय पदावर काम करत असताना प्रशासकीय बाबी कशाप्रकारे हाताळाव्यात यासंदर्भात मार्गदर्शन केले.

यावेळी भाषा अभ्यास प्रशाळेतील सहाय्यक प्राध्यापक डॉ. दीपक खरात, डॉ. प्रीती सोनी, डॉ. सुदर्शन भवरे, कृष्णा संदानशिव, प्रीती मनुचारी, प्रतिभा गलवाडे, नेहा लाम्हणे, जितेंद्र नाईक संशोधक विद्यार्थी महेश सूर्यवंशी यांनी प्रशासनात येणारे विविध अनुभव सांगत प्रशासनातील कामकाजविषयी चर्चा केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक प्रा. प्रतिभा गलवाडे यांनी केले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक:३ नोव्हेंबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता